सिंधुदुर्ग, सोमवार, २३ मे २०२२ शहर-जिल्हा पुढारी

# आजीवन अध्ययन विभागाचा विद्यार्थ्यांना फायदा : डॉ.जाधव

**दोडामार्ग : पुढारी वृत्तसेवा**

आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांनी अनेक संधी प्राप्त केल्या आहेत. अनेक विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे धडे मिळाले आहेत. विद्यार्थी स्वावलंबी बनविण्याचे कार्य या विस्तार विभागातून होत आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या विभागात सहभागी झाले पाहिजे, असे मत मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे संचालक प्रोफेसर डॉ. कुणाल जाधव यांनी व्यक्त केले.

हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग वार्षिक मूल्यमापन या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी किरण पाटील, सचिन राऊत, गौतम गायकवाड, प्रशांत कांबळे व क्षेत्र समन्वयक प्रा. यु. टी. परब उपस्थित होते.



**दोडामार्ग : प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांचा सत्कार करताना प्रो. डॉ. कुणाल जाधव व अन्य.**

डॉ. कुणाल जाधव यांनी डी. एल.एल.ई विभागाच्यावतीने राबविण्यात आलेले व येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांचा डी.एल.एल.ई. विभागाच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. सुभाष सावंत यांनी या विभागाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यशिक्षक प्रा. एस.एस. पाडगावकर यांनी तर आभार प्रा. प्रीती प्रसादी यांनी मानले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील महाविद्यालयीन विस्तार कार्यशिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.